INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 5 | JUNE - 2023

# इयत्ता दुसरीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयातील शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी उपक्रम राबवणे व उपक्रमाची परिणामकारकता तपासणे

**श्री. बालासाहेब मोहनराव चिवडे**
**शिक्षण:-एम.ए.डी.एड.डी.एस.म. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मसला (खुर्द) तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद.**

## संशोधनाची उद्दिष्टे



1. इयत्ता दुसरीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची शब्द संपत्ती वाढवणे.
2. विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती वाढवण्यासाठी उपक्रम राबविणे
3. शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी राबवलेल्या उपक्रमांची परिणामकारकता तपासणे

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-

1. सदर संशोधन हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मसला (खुर्द) तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद या शाळेपुरते मर्यादित आहे.
2. सदर संशोधन इयत्ता दुसरी वर्गाच्या इंग्रजी या विषयापुरते मर्यादित आहे.

## निष्कर्ष

1. प्रचलित अध्यापन पद्धतीने अध्यापन केल्यावर जास्तीत जास्त इंग्रजी शब्दांची ओळख झाली नाही.
2. शैक्षणिक साधनांच्या उपयोगामुळे (चित्रे, शब्द पट्ट्या) अध्ययन आनंददायी बनले व शब्द ओळख प्रभावीपणे झाली.
3. चित्रे व शैक्षणिक साधनांचा वापर कमी प्रमाणात होणाऱ्या शब्दांच्या ओळखीसाठी वाचनाचा प्रयोग महत्त्वाचा व प्रभावी ठरला.
4. विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती आजमावता आली.
5. प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केल्याने अध्यापन प्रभावी ठरले.
6. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात आवड निर्माण झाली. शिफारशी

संशोधकाने प्रस्तुत समस्येवर संशोधन केले. त्यासाठी संशोधकाने अनेक पद्धती, साधने व साहित्य वापरले होते. संशोधकाने या समस्येचा गाढ अभ्यास करून त्यावर उपाययोजना करून ती समस्या दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच संशोधकाने प्रस्तुत समस्येवर काही शिफारसी सुचविलेल्या आहेत.त्या खालील प्रमाणे आहेत.

1. प्रस्तुत समस्या अतिशय व्यापक आहे. तिचा गाढ अभ्यास करून त्या समस्येवर उपाययोजना करता येईल.
2. प्रस्तुत संशोधन हे प्रायोगिक तत्त्वावर आधारित असून प्रायोगिक पद्धतीचाच वापर करण्यात यावा.

3. संशोधकाने संशोधन करताना चिकित्सक वृत्तीची जोपासना करावी.
4. प्रस्तुत संशोधन प्रायोगिक स्वरूपाचे असल्यामुळे अशा समस्येतील प्रयोगात विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग करून घ्यावा.